क्र.२/नसवि/महासभा/ ०५ /२०११-२०१२
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- १० ऑगष्ट २०११

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका सभा क्रमांक - ०५ /२०११-२०१२

## महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,

मा. ----------

सदस्य/सदस्या,

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक १८/०८/२०११ रोजी दुपारी ०३.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचारार्धीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

### परिशिष्ट

१. मागील सर्वसाधारण सभा दि. २०/०७/२०११ चे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
   अ) दुःखवट्याचे ठराव.
   ब) अभिनंदनाचे ठराव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिकेच्या क्षेत्रातील सन २००६-०७ या कालावधी मधील जकात वसुलीसाठी जकात ठेका देणेत आला होता. सदर जकात ठेका प्रकरणात ज्या अनियमितता झाल्या होत्या व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले होते. त्या संदर्भात तत्कालीन अतिरिक्त आयुक्त श्री.वाय.बी.माळी यांची श्री.व्ही.टी.पत्की सेवा निवृत्त वन संरक्षक यांची चौकशी अधिकारी नियुक्ती करुन चौकशी करणेत आली होती.चौकशी अधिकारी यांचे चौकशी अहवालाचे अनुषंगाने अपचारी श्री.माळी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीसीस अनुसरुन श्री.माळी यांनी त्यांचेवर चौकशी अहवालानुसार लावलेल्या आरोपांचे खंडण करुन मान्य नसलेबाबत खुलासा सादर केला असून, स्वतः निरापराध असलेचे प्रतिपादन केले आहे. त्यांनी दिलेला खुलासा आधारहिन व संयुक्तीक नाही. एकंदरीत प्रस्तुत प्रकरणी आर्थिक नुकसानीस जबाबदार असणाऱ्या विरुद्ध कारवाई करण्याचे मा.महालेखापाल, नगरविकास विभाग यांचे निदेश आहेत. महानगरपालिकेचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असल्याने, श्री.माळी यांचेवर आठ आरोप सिद्ध झाले असल्याने, श्री.माळी हे संयुक्तीकरित्या जबाबदार असल्याचे प्रशासनाचे मत आहे. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसानीचा भाग म्हणून र.रु.५० लाख त्यांचे स्वतःचे व कुटुंबाचे ज्ञात मालमत्ता व स्त्रोतातून वसुल करणे संयुक्तीक आहे. त्यानुसार शिस्तभंगाबाबत महाराष्ट्र नागरी सेवा नियम (शिस्त व अपिल) १९७९ चे कलम ५ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीचे अंतर्गत दंडात्मक व शिक्षा म्हणून त्यांना किमान उदरनिर्वाह इतके म्हणजेच १/३ सेवानिवृत्ती वेतन सुरु ठेवून उर्वरित २/३ सेवानिवृत्ती वेतन कायमस्वरुपी मनपा निधीत जमा करुन जप्त करणे कायदेशीर व संयुक्तीक आहे. त्यास मान्यता मिळणेसाठी विचारार्थ व निर्णयार्थ आलेले **उपायुक्त (आस्थापना विभाग)यांचे दि.२०/०७/२०११ चे विषयपत्र.**

... २...

५. महानगरपालिकेच्या सांगली येथील राणी सरस्वती देवी कन्याशाळा समोरील पूर्व-पश्चिम रस्त्यास "गुरुवर्य कै.यशवंत दत्तात्रय लिमये" मार्ग असे नामकरण करणेस महासभा ठराव क्र.३७ दि.२०/०५/२०१० अन्वये जाहिर सूचना प्रसिद्ध करुन, हरकती व सूचना मागविणेस मान्यता मिळाली होती. विहित मुदतीत हरकती व सूचना प्राप्त न झालेने, राणी सरस्वती देवी कन्याशाळा समोरील पूर्व-पश्चिम रस्त्यास "गुरुवर्य कै.यशवंत दत्तात्रय लिमये" मार्ग असे नामकरण करणेस अंतिम मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२०/०७/२०११ चे विषयपत्र.**

६. महानगरपालिकेच्या सांगली येथील लक्ष्मी मंदिर ते चिन्मय पार्क ८० फुटी रस्त्याचे "गुरुवर्य शिवानंद गोविंद कोटीभास्कर" असे नामकरण करणेस महासभा ठराव क्र.२३५ दि.१८/०२/२०११ अन्वये जाहिर सूचना प्रसिद्ध करुन, हरकती व सूचना मागविणेस मान्यता मिळाली होती. विहित मुदतीत हरकती व सूचना प्राप्त न झालेने, लक्ष्मी मंदिर ते चिन्मय पार्क ८० फुटी रस्त्याचे "गुरुवर्य शिवानंद गोविंद कोटीभास्कर" असे नामकरण करणेस अंतिम मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.३०/०७/२०११ चे विषयपत्र.**

७. महानगरपालिकेच्या सांगली येथील सांगली जिल्हा परिषद अध्यक्षांचे निवासस्थानासमोर सांगली मिरज रोड पूर्व-पश्चिम जाणारा व त्या विभाजन करणाऱ्या दक्षिणोत्तर रस्त्याचे समोरील चौकास "शहीद कै.अशोक कामटे" असे नामकरण करणेस महासभा ठराव क्र.२३६ दि.१८/०२/२०११ अन्वये जाहिर सूचना प्रसिद्ध करुन, हरकती व सूचना मागविणेस मान्यता मिळाली होती. विहित मुदतीत हरकती व सूचना प्राप्त न झालेने, सांगली जिल्हा परिषद अध्यक्षांचे निवासस्थानासमोर सांगली मिरज रोड पूर्व-पश्चिम जाणारा व त्या विभाजन करणाऱ्या दक्षिणोत्तर रस्त्याचे समोरील चौकास "शहीद कै.अशोक कामटे" असे नामकरण करणेस अंतिम मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.३०/०७/२०११ चे विषयपत्र.**

८. महानगरपालिकेच्या सांगली येथील पत्रकार नगर येथील क्रांती कॉलनी मधील उद्यानास "कै.सुभाष पाटील (सावर्डेकर) उद्यान" असे नामकरण करणेस महासभा ठराव क्र.२३६ दि.१८/०२/२०११ अन्वये जाहिर सूचना प्रसिद्ध करुन, हरकती व सूचना मागविणेस मान्यता मिळाली होती. विहित मुदतीत हरकती व सूचना प्राप्त न झालेने, पत्रकार नगर येथील क्रांती कॉलनी मधील उद्यानास "कै.सुभाष पाटील (सावर्डेकर) उद्यान" असे नामकरण करणेस अंतिम मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.३०/०७/२०११ चे विषयपत्र.**

९. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

१०. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

२१/७/११

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :-१८/०८/२०११

ठराव क्रमांक :- ९९

विषय क्रमांक :- ०१

---

मागील सर्वसाधारण महासभा दि.२०/०७/२०११ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र. ६५ ते ठराव क्र. ९५ हे सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक Keerrov ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :-१८/०८/२०११

ठराव क्रमांक :- १९०

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे मा.उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.०५/०३/२०११ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील सन २००६-२००७ या कालावधीतील जकात वसुलीसाठी ठेका देणेत आला होता. सदर जकात ठेका प्रकरणात अनियमितता झाल्या होत्या. त्यामध्ये महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले होते. यासाठी तत्कालीन अतिरिक्त आयुक्त श्री.वाय.बी.माळी यांची सेवानिवृत्त वनसंरक्षक श्री.व्ही.टी.पत्की यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करुन चौकशी करणेत आली होती. चौकशी अधिकारी यांनी दि.०१/०२/२०१० रोजी चौकशी अहवाल सादर केला होता. सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने अपचारी श्री.माळी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. याकामी श्री.माळी यांनी दि.३१/०७/२०१० रोजी खुलासा सादर केला असून, चौकशी अहवालामध्ये लावलेल्या आरोपांचे खंडन करुन आरोप मान्य केलेले नाहीत.

सेवानिवृत्त अतिरिक्त आयुक्त श्री.वाय.बी.माळी यांनी सादर केलेला दि.३१/०७/२०१० च्या खुलाशा प्रित्यर्थ त्यांनी काहीच अभिलेख कागदपत्र सादर केलेले नाहीत. त्यांचा खुलासा अग्राह्य असून, त्यांनी खुलाशामध्ये आर्थिक नुकसानीस तत्कालीन जकात अधिक्षक आणि आयुक्त हे जबाबदार असून, ते स्वत: निरपराध असल्याचे प्रतिपादन केले आहे. हे त्यांचे म्हणणे अनुचित आहे.

चौकशी अधिकारी यांनी श्री.माळी यांना आरोपाच्या अनुषंगाने बचावासाठी पूर्ण संधी दिल्याचे दिसून येते. चौकशी अधिकारी यांनी काढलेले चौकशीचे निष्कर्ष न्यायीक व तर्क सुसंगत असल्याचे विषयपत्रात नमुद आहे.मक्तेदाराकडुन जकाती पोटी येणारी दैनंदिन रक्कम वसुल करण्यात श्री.माळी यांचेकडून कर्तव्यात गंभीर कसुर झाली आहे. सदरची कर्तव्यातील कसुर ही हेतुपुरस्कर आणि असदहेतुने तसेच राजकीय प्रभावाखाली झालेची शक्यता नाकारता येत नाही परंतु असे समर्थन उपायुक्त सारख्या जबाबदार पदावरील अधिकाऱ्यास शोभनीय नाही. त्यामुळे श्री.माळी यांनी दिलेला खुलासा हा आधारहीन व संयुक्तीक नाही.

श्री.वाय.बी.माळी हे जरी सेवानिवृत्त असले तरी त्यांची चौकशी ही सेवेत असताना चालू होती. तथापि, त्यांनी याकामी स्थायी समिती व महासभा यांचेकडे अपील दाखल केलेबाबत नमुद केले असले तरी, सदर प्राधिकरणानी कोणताही ठराव अथवा आदेश पारीत केलेचे अभिलेखात आढळून येत नाही. सदर प्रकरणी आर्थिक नुकसानीस जबाबदार असणाऱ्या विरुद्ध कारवाई करण्याचे मा.महालेखापाल, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे निर्देश आहेत.

विषयांकीत प्रकरण हे अत्यंत संवेदनशील असून, महापालिकेचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असल्याने श्री.माळी यांचेवरील आठ आरोप सिद्ध झाले असलेने, श्री.माळी हे संयुक्तरित्या जबाबदार असल्याचे प्रशासनाने विषयपत्रात नमूद केले आहे. श्री.माळी या जबाबदार अधिकाऱ्याच्या निष्काळजीपणामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले असून, त्यास जबाबदार धरुन र.रु.५० लाख इतकी रक्कम त्यांचे स्वत:चे व कुटूंबाचे ज्ञात मालमत्ता व स्त्रोतातून वसुल करणे संयुक्तीक आहे. या शिस्तभंगाबाबत महाराष्ट्र नागरी सेवा नियम (शिस्त व अपिल) १९७९ चे कलम ५ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदी अंतर्गत दंडात्मक व शिक्षा म्हणून त्यांना किमान उदरनिर्वाह इतके म्हणजे १/३ सेवानिवृत्ती वेतन सुरु ठेवून उर्वरित २/३ सेवा निवृत्ती वेतन कायमस्वरुपी महापालिका निधीत जमा करुन जप्त करणेस मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करणेत आला आहे

प्रस्तुत प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली
निर्णय घेत आहे. प्रशासनाने विषयपत्रात नमुद केलेल्या कार
आहे. महानगरपालिका क्षेत्रातील सन २००६-२००७ या
देणेत आला होता. सदरचा ठेका अनेक कारणांनी द.
प्रकरणात अनियमितता झाली असल्याने, महापालिकेचे अ..
प्रकरणी चौकशी मध्ये तत्कालीन अतिरिक्त आयुक्त श्री.वाय.बी.मा
झालेले आहेत. त्यामुळे त्यांचेवर प्रशासनाने प्रस्तावित केलेनुसार कारवा
वाटते.

सबब, तत्कालीन अतिरिक्त आयुक्त श्री.वाय.बी.माळी यांनी कर्तव्यात कसु
महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. आर्थिक नुकसानीचा भाग म्हणून श्री.माळी यांचेकडे
र.रु.६० लाख इतकी रक्कम त्यांचे स्वत:चे व कुटुंबाचे ज्ञात मालमत्ता व स्त्रोतातून वसुलात
आणणेसाठी महाराष्ट्र नागरी सेवा नियम (शिस्त व अपील) १९७९ चे कलम ५ आणि मुंबई प्रांतिक
महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई व शिक्षा म्हणून र.रु.६०
लाख वसुलात आणणेकामी श्री.माळी यांना किमान उदरनिर्वाह इतके म्हणजे १/३ सेवानिवृत्ती वेतन
सुरु ठेवून उर्वरित २/३ सेवा निवृत्ती वेतन कायम स्वरुपी जप्त करुन, मनपा निधीत जमा करणेस
विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे. यासाठी मा.आयुक्तसो यांना ही सभा
प्राधिकृत करीत आहे.

तसेच, सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार प्रस्तुत प्रकरणी जबाबदार असलेल्या अन्य
अधिकाऱ्याचे बाबतीत चौकशी करुन योग्यती कार्यवाही ठेवण्यात यावी असे ही सभा आदेशीत
करीत आहे.

सूचक

अनुमोदक

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

प्रशासन अधिकारी (अस्था)

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :-१८ /०८/२०११

ठराव क्रमांक :- 999

विषय क्रमांक :- ०५

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२०/०७/२०११ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या सांगली येथील राणी सरस्वती देवी कन्याशाळा समोरील पूर्व-पश्चिम रस्त्यास "गुरुवर्य के.यशवंत दत्तात्रय लिमये" मार्ग असे नामकरण करणेस महासभा ठराव क्र.३७ दि.२०/०५/२०१० अन्वये जाहिर सूचना प्रसिद्ध करुन, हरकती व सूचना मागविणेस मान्यता मिळाली होती. त्यानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर सूचना प्रसिद्ध करुन, हरकती व सूचना मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत हरकती व सूचना प्राप्त न झालेने, महनगरपालिकेच्या सांगली येथील राणी सरस्वती देवी कन्याशाळा समोरील पूर्व-पश्चिम रस्त्यास "गुरुवर्य के.यशवंत दत्तात्रय लिमये" मार्ग असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- Keerzon

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :-१८/०८/२०११

ठराव क्रमांक :- १९२

विषय क्रमांक :-०६

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.३०/०७/२०११ चे विषयपत्र या सभेनें अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या सांगली येथील लक्ष्मी मंदिर ते चिन्मय पार्क ८० फुटी रस्त्याचे "गुरुवर्य शिवानंद गोविंद कोटीभास्कर" असे नामकरण करणेस महासभा ठराव क्र.२३५ दि.१८/०२/२०११ अन्वये जाहिर सूचना प्रसिद्ध करुन, हरकती व सूचना मागविणेस मान्यता मिळाली होती. त्यानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर सूचना प्रसिद्ध करुन, हरकती व सूचना मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत हरकती व सूचना प्राप्त न झालेने, महनगरपालिकेच्या सांगली येथील विहित मुदतीत हरकती व सूचना प्राप्त न झालेने, लक्ष्मी मंदिर ते चिन्मय पार्क ८० फुटी रस्त्याचे "गुरुवर्य शिवानंद गोविंद कोटीभास्कर" असे नामकरण करणेस अंतिम मान्यता मिळणेकामी विषयांकीत प्रस्ताव सादर केलेला आहे. तथापि, विषयांकीत रस्त्यास यापुर्वी नामकरण झालेचे सभेमध्ये विदित करणेत आले. सबब, प्रस्तुतचा प्रस्ताव ही सभा रद्द करीत आहे.

सूचक Keerion

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :-१८/०८/२०११

ठराव क्रमांक :- 993

विषय क्रमांक :-०७

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.३०/०७/२०११ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज रोड पूर्व-पश्चिम जाणारा व त्या विभाजन करणाऱ्या दक्षिणोत्तर रस्त्याचे समोरील चौकास "शहीद कै.अशोक कामटे" असे नामकरण करणेस महासभा ठराव क्र.२३६ दि.१८/०२/२०११ अन्वये जाहिर सूचना प्रसिद्ध करुन, हरकती व सूचना मागविणेस मान्यता मिळाली होती. त्यानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर सूचना प्रसिद्ध करुन, हरकती व सूचना मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत हरकती व सूचना प्राप्त न झालेने, विहित मुदतीत हरकती व सूचना प्राप्त न झालेने, महानगरपालिकेच्या सांगली येथील सांगली जिल्हा परिषद अध्यक्षांचे निवासस्थानासमोर सांगली मिरज रोड पूर्व-पश्चिम जाणारा व त्या विभाजन करणाऱ्या दक्षिणोत्तर रस्त्याचे समोरील चौकास "शहीद कै.अशोक कामटे" असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक

अनुमोदक

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :-१८/०८/२०११

ठराव क्रमांक :- ११४

विषय क्रमांक :-०६

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.३०/०७/२०११ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या सांगली येथील पत्रकार नगर येथील क्रांती कॉलनी मधील उद्यानास "कै.सुभाष पाटील (सावर्डेकर) उद्यान" असे नामकरण करणेस महासभा ठराव क्र.२३६ दि.१८/०२/२०११ अन्वये जाहिर सूचना प्रसिद्ध करुन, हरकती व सूचना मागविणेस मान्यता मिळाली होती. त्यानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर सूचना प्रसिद्ध करुन, हरकती व सूचना मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत हरकती व सूचना प्राप्त न झालेने, महानगरपालिकेच्या सांगली येथील पत्रकार नगर येथील क्रांती कॉलनी मधील उद्यानास "कै.सुभाष पाटील (सावर्डेकर) उद्यान" असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.हरिदास पंडित पाटील यांनी दिलेली सूचना दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या सांगलीवाडी वॉर्ड क्र.१७ मधील जुना समडोळी रोड येथील कॉर्नर लगत हारुगडे कॉलनी आहे. सदरचा रस्ता हारुगडे कॉर्नर म्हणून नागरिकांना परिचित आहे. त्यामुळे सदर कॉर्नरला "हारुगडे कॉर्नर" असे नामकरण करणेस आणि सदर वॉर्डातील महानगरपालिकेच्या बगीच्या जवळील चौकामध्ये वारकरी समाजातील नागरीकांची अनेक वर्षांची मागणी होत असून सदर चौकास "विठ्ठल प्रेमी चौक" असे नामकरण करणेची मागणी केली आहे. त्यास ही सभा मान्यता देत असून, प्रस्तुत नामकरणाचे कामी महासभेने निश्चित केलेनुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर सूचना प्रसिद्ध करुन, हरकती व सूचना मागविणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Keerron

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

माहमला व्यवस्थापक
मा. अयुक्तसो यांचे निर्देशनास आणून
कार्यवाही ठेवा.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर [illegible]

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :-१८/०८/२०११

ठराव क्रमांक :- ११६

विषय क्रमांक :- ऐन

सोबतचे मा.उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१७/०८/२०११ चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेच कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

महाराष्ट्र शासनाने दि.२८/११/२००३ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील महानगरपालिकांना क्रिडा स्पर्धेसाठी जिल्ह्याचा दर्जा प्रधान केलेला आहे. तसेच, जिल्ह्यातील जिल्हा क्रिडा अधिकारी यांचे सहकार्याने महानगरपालिकेने स्वत: स्पर्धांचे आयोजन करावे असे सूचित केले आहे. त्यानुसार सन २०१०-११ जिल्हा क्रिडा परिषदेने महानगरपालिका जिल्हा दर्जा क्रिडा स्पर्धेचे आयोजन यशस्वी रितीने पार पाडले आहे. सन २०११-१२ या आर्थिक वर्षात जिल्हा दर्जा क्रिडा स्पर्धेचे आयोजन करणेकामी झालेल्या बैठकी मध्ये सदर क्रिडा स्पर्धेसाठी महानगरपालिकेने रु.२ लाख इतका खर्च करणेस मान्यता दिली आहे. सन २०११-१२ या अर्थसंकल्पामध्ये पुरेशी तरतुद नसल्याने ००४) इमारत योजना - ०६४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्टेडीयम विकसीत करणे र.रु.१५ लाख मधून र.रु.३,५०,०००/- ००१) सामान्य प्रशासन ०६८) क्रिडा स्पर्धा आयोजन अनुदान क्रिडा संघ दत्तक योजना या खातेवर तबदिल करणेस मुख्यलेखापरिक्षक यांनी नमुना नं.१० साक्षांकित केलेनुसार विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक

अनुमोदक

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

मुख्य लेखापाल
शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :-१८ /०८/२०११

ठराव क्रमांक :- ११५७

विषय क्रमांक :- ऐन

---

सोबतचे मा.उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१७/०८/२०११ चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेच कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम विभागाकडील विविध विकास कामे महानगरपालिकेच्या नोंदणीकृत मक्तेदाराकडून केली जातात. नोंदणी केलेल्या मक्तेदारांची मुदत दि.३१/०३/२०११ रोजी संपुष्टात आलेने, महासभा ठराव क्र.५९ दि.१८/०६/२०११ ने मक्तेदारांची नोंदणीपत्राची मुदत माहे जुलै २०११ पर्यत वाढविणेस मान्यता दिलेली आहे. तथापि, सदर मान्यतेनुसार जाहिर सुचना प्रसिद्ध करुन मक्तेदारांचे अर्ज स्विकारुन अर्जाची छाननी करुन मक्तेदारांना नोंदणी प्रमाणपत्र देणेस, दिनावधी लागणार आहे. तथापि, महानगरपालिकेस मा.शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानांतर्गत तसेच, सन २०११-१२ चे अर्थसंकल्पामध्ये तरतुदीत केलेल्या कामगिऱ्यांना प्रशासकीय मान्यता मिळाली असल्याने, महापालिका क्षेत्रातील विकास कामांचा खोळंबा होवू नये म्हणून महानगरपालिकेच्या नोंदणीकृत मक्तेदारांची मुदत माहे आक्टोंबर २०११ पर्यंत मुदतवाढ देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक Kerron

अनुमोदक

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

आहे अभिप्राय

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.